# अधिसूचना

## जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती.

क्रमांक -प्र.अ./भुस./अका./कावि. ८९८/ २०१८ दिनांक :-२५/०९/२०१८

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

प्रकरण क्रमांक :- २१/४७/२०१०-११ मौजा- रेडवा ता.चांदूर बाजार

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी आता, असे घोषीत करण्यात येत आहे. की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते उक्त अधिनियमाच्या

प्रकरण चार_खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सि. कामे, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

गाव- रेडवा तालुका -चांदूर बाजार जिल्हा - अमरावती

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २/१ | ०.०२ |
| २ | २/२ | ०.०२ |
| ३ | २/३,२/४ | ०.०३ |
| ४ | १२ | ०.०९ |
| ५ | ३०/३ | ०.०५ |
| ६ | १३/२ | ०.०८ |
| ७ | १३/३ | ०.०६ |
| ८ | १३/४ | ०.०४ |
| ९ | १४पैकी | ०.०४ |
| १० | १४पैकी | ०.०३ |
| ११ | १४ पैकी | ०.०३ |
| १२ | १४/२पैकी | ०.०४ |
| १३ | १४/२ पैकी | ०.०३ |
| १४ | १४/२पैकी | ०.०४ |
| १५ | १४/२पैकी | ०.०६ |
| एकूण | | ०.६६ |

## अनुसूची - दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- गणेशपुर रेडवा पिठोडा घाटलाडकी रस्त्याची सुधारणा करणे
**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- रस्त्याचे कामाकरीता
**समाजाला मिळणारे लाभ :-** सदर रस्त्याचे कामामुळे परिसरातील लोकांना शेतातील माल मुख्य बाजारपेठेमध्ये नेता येईल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होईल तसेच तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच शालेय व आरोग्य विषयक सुविधेकरीता तालुक्याचे ठिकाणी जाण्या येण्याकरीता जवळचा रस्ता तयार होईल.

## अनुसूची - तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** विस्थापनाची आवश्यकता नाही.
सबब माहिती निरंक

## अनुसूची - चार
## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश. दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता:- :- निरंक

**(क)** ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील :- निरंक.

टिप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.सिं. कामे, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :-** २५/०८/२०१८

**ठिकाण :- अमरावती.**

**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)**
**ल.सिं. कामे अमरावती.**

25/09/18

**(अभिजीत बांगर)**
**जिल्हाधिकारी अमरावती**